**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** बल्लारशाह

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0240 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/04/2025 23:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Date From (दिनांक पासून):** 23/03/2025
**Time Period (कालावधी):**
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2025
**Time From (वेळेपासून):** 15:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/04/2025 **Time (वेळ):** 22:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 062

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/04/2025 23:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय बल्लारपुर,बल्लारपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मोहमद रियाज मोहमद ईकबाल शेख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कोठारी,बल्लारपुर,बल्लारशाह,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कोठारी,बल्लारपुर,बल्लारशाह,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823610466

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभय अर्जुन गायकवाड | | | 1. तहसिल कार्यालय बल्लारपुर, बल्लारपुर,बल्लारशाह,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सचिन रघुनाथ पुकळे | | | 1. कवडजई,बल्लारपुर ,बल्लारशाह, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | एक लाल रंगाचा रेडमी कंपनीचा नोट 5 प्रो अँन्ड्रोईड मोबाईल | 15,000.00 |
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | सॉडीक्स कंपनिचे 32 GB क्षमतेचे 3 मेमोरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
दिनांक:- 01/04/2025
ठिकाण:- बल्लारपूर

मी मोहम्मद रियाज मोहम्मद इकबाल शेख, वय 37 वर्ष, व्यवसाय - बिल्डींग मटेरिअल सप्लायर, रा. कोठारी, ता. बल्लारशाह, जि. चंद्रपूर दि. 26/03/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे जाऊन श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने खालीलप्रमाणे तक्रार दिली.
''सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वरील नमुद पत्त्यावर परिवारासह राहतो व मागील 20 वर्षापासून बिल्डींग मटेरिअल जसे विटा, गिट्टी, रेती, मुरूम व माती सप्लाय करण्याचे काम करतो. सदर व्यवसाय करण्याकरीता माझेकडे माझे भावाचे नावाने 2 ट्रक्टर आहे.
दि. 23/03/2025 रोजी माझे स्वत:चे नावाने मौजा कोठारी येथील सव्हे नं. 452 असलेल्या शेतात माती/मुरूम काढून स्वत:चे शेताचे लेव्हलींगचे काम सुरू होते. सदर कामाकरीता मी श्री. विकास मेश्राम, रा. कवडजई, ता. बल्लारशाह यांचेकडील 1 जे.सी.बी. व श्री. प्रमोद देवाडकर, रा. कोठारी यांचेकडील 1 ट्रक्टर भाडेतत्त्वावर तसेच माझे भावाचे नावाने असलेली 1 ट्रक्टर माझे शेतात होती. सदर काम सुरू असतांना दुपारी 03/50 वा. दरम्यान माझेकडे ड्राइव्हर कामाकरीता असलेले श्री. संदिप नैताम यांचा मोबाइल क्र. 8698133959 वरून माझे मोबाइल क्रमांक 9823610466 वर फोन आला व त्यांनी मला तलाठी व तहसीलदार साहेब शेतात आले असल्याचे सांगुन मला बोलवित असल्याबाबत सांगितले. त्यामुळे मी माझे शेतात जिथे लेव्हलींग करण्याचे काम सुरु होते तेथे मी गेलो. कवडजई साजाचे तलाठी सचिन व बल्लारशाह तहसीलचे तहसीलदार श्री. गायकवाड साहेब मला माझे शेतात दिसुन आल्याने मी त्यांना जावून भेटलो असता तहसीलदार गायकवाड साहेबांनी मला जेसीबी ने शेतातील माती काढण्याबाबत परवानगी घेतली आहे काय? असे विचारले असता मी त्यांना माझेकडे परवानगी नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी माझे शेतात भावाचे नावाने असलेली ट्रक्टर क्र. एम.एच. 34 एल. 8694 व मी किरायाने आणलेली जेसीबी व ट्रक्टर जप्त करावी लागते असे सांगितले. त्यावर मी त्यांना काम थोडसंच असल्यामुळे मी काही परवाना काढला नाही असे म्हणुन साहेब गाड्या जप्त करू नका अशी विनंती केली असता तहसीलदार गायकवाड साहेब व तलाठी सचिन हे थोड्या बाजुला जावून बोलले. त्यानंतर तलाठी सचिन यांनी मला थोड्या बाजुला एकट्यात घेवून गेले व मला म्हणाले की,'जेसीबी व 2 ट्रक्टर जप्त केली तर 9 लाख 60 हजार रू. चा फाइन लागणार असुन जर तुला फाइन भरायचा नसेल तर जेसीबी व 2 ट्रक्टर जप्त न करण्याकरीता तसेच तुझ्यावर कोणतीही कारवाइ न करण्याकरीता तहसीलदार साहेबांकरीता 2 लाख व माझेकरीता 20,000/- रू. असे एकुण 2 लाख 20 हजार रू. दे' असे म्हणून मला लाचेची मागणी केली. तेव्हा

माझेकडे तेवढे पैसे नसल्याने मी त्यांना सध्या एवढी रक्क्म माझेकडे नसल्याचे सांगितले असता त्यांनी मला आता जेवढे आहे तेवढे आणुन द्या. त्यामुळे मी तेथुन माझे घरी गेलो व माझे जवळ असलेले 1 लाख 19 हजार 900 रू. ज्यामध्ये 500 रू. च्या 70, 200 रू. च्या 200, 100 रू. च्या 409 व 50 रू. च्या 80 अशा वर्णनाच्या नोटा आणुन अंदाजे 4/45 वा. दरम्यान तलाठी सचिन यांचे जवळ दिले. तलाठी सचिन यांनी मी दिलेल्या रक्कमेतील 20 हजार रू. स्वत:जवळ ठेवून बाकीचे 99 हजार 900 रू. तहसीलदार गायकवाड साहेब यांना माझेसमोरच दिले. त्यानंतर तहसीलदार व तलाठी माझेवर कोणतेही कारवाई न करता निघुन गेले.

त्यानंतर मी माझे घरी असतांना अंदाजे सायंकाळी 07/20 वा. दरम्यान जेसीबी वाले विकास याचे मोबाईल क्र. 6300611395 वरून माझे मोबाईल क्रमांकावर फोन आला व त्यांनी कवडजईचे तलाठी यांनी फोन करून उर्वरित 1 लाख रू. मागत असल्याबाबत मला सांगुन कवडजईचे तलाठी यांचेसोबत बोलुन घेण्याबाबत सांगितले व त्यांचा मोबाईल क्रमांक माझे व्हॉट्सअप वर पाठविला. विकास यांनी पाठविलेला नंबर मी माझे मोबाईलमध्ये सेव्ह करून अंदाजे सायंकाळी 7/50 वा. दरम्यान मी माझे मोबाईल क्रमांकावरून कवडजईचे तलाठी सचिन यांचे मोबाईल क्र. 9730470210 वर फोन केला असता त्यांनी मला तहसीलदार साहेब पैसे कमी दिल्यामुळे रागवत असुन तुमचेवर कारवाई करणार असे म्हणत असल्याबाबत मला सांगुन मला उद्या दि. 24/03/2025 रोजी दुपारी 02/00 दरम्यान कोठारी येणार असल्याचे सांगुन भेटायला येण्यास सांगितले.

त्यामुळे मी दि. 24/03/2025 रोजी दुपारी 02/00 वा. दरम्यान तलाठी सचिन यांना फोन करून कोठारीला आले काय? असे विचारले असता त्यांनी कोठारीला आल्यानंतर फोन करतो असे सांगितले. अंदाजे दुपारी 02/55 वा. दरम्यान तलाठी सचिन यांचा मला फोन आला व ते कोठारी येथे मेन रोडवर राजु हिवरे यांचे धाब्याजवळ आल्याचे मला सांगितले. त्यामुळे मी त्यांना कोठारी येथे मेन रोडवर जावून तलाठी सचिन यांना जावून भेटलो असता त्यांनी मला 'तुम्ही गद्दारी केले, तुम्हाला 2 लाख 20 हजार सांगितले होते, तुम्ही 1 लाख 20 हजार रू. दिले. तहसीलदार साहेब माझेवर रागवत आहे, उर्वरित 1 लाख रू. आज संध्याकाळ पर्यंत द्या.' असे म्हणाले असता मी त्यांना माझेजवळ आता ऐवढे पैसे नाही काही वेळ द्या' असे म्हणुन मी तेथुन निघुन गेलो. त्यानंतर सायंकाळी 06/00 वा. दरम्यान माझे मोबाईलवर 9421230210 या मोबाईल क्रमांकावरून तलाठी सचिन यांनी फोन केला व मला परत 1 लाख रू. ची मागणी केली तेव्हा मी माझेकडे आता एवढी रक्कम नसल्याबाबत त्यांना सांगितले.

दि. 25/03/2025 रोजी सकाळी 10/50 वा. दरम्यान मला परत कवडजईचे तलाठी सचिन यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9730470210 वरून माझे मोबाईलवर व्हॉटसअप कॉल करून मला बुधवारी संध्याकाळ पर्यंत 1 लाख रू. देण्याबाबत सांगितले. परंतु मला कवडजईचे तलाठी सचिन व तहसीलदार गायकवाड साहेब यांना 1 लाख रू. लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचेकडून होणा-या त्रासामुळे मी त्यांना नाईलाजास्तव होकार दिला.

परंतु माझी त्यांना 1 लाख रू. लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी सकाळी 10/00 वा. दरम्यान एसीबी. चे भोसले मॅडम यांना फोन करून मला एक लाच मागणी संबंधाने तक्रार द्यायची असल्याचे सांगितले असता भोसले मॅडम यांनी मला एसीबी कार्यालयात येवून लेखी तक्रार द्यावी लागेल तसेच जेवढी रक्कम मागणी केली आहे ती घेवून येण्यास सांगितले. त्यामुळे मी आज दि. 26/03/2025 रोजी दुपारी 11/00 वा. दरम्यान एसीबी. कार्यलिय चंद्रपूर येथे हजर येवून वरील प्रमाणे माझी तक्रार सांगितली.

माझा तलाठी सचिन व तहसीलदार गायकवाड साहेब यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. त्यांनी माझी दि. 23/03/2025 रोजी माझे शेतात माती काढून लेव्हलींगचे काम करण्याकरीता असलेली माझी ट्रक्टर व मी किरायाने आणलेली जेसीबी जप्त न करण्याकरीता व माझेवर कोणतीही कारवाइ न करण्याकरीता मला मागणी केलेल्या रक्कमेतील उर्वरित 1 लाख रू. लाचेची मागणी केल्या प्रकरणी कारवाई होण्याकरीता कवडजईचे तलाठी सचिन व बल्लारशाह चे तहसीलदार गायकडवाड साहेब यांचेविरूध्द लेखी तक्रार देत आहे. तरी माझे तक्रारीवरून मला 1 लाख रू. लाच मागणा-या कवडजईचे तलाठी सचिन व बल्लारशाह चे तहसीलदार गायकडवाड साहेबं यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे.'' याप्रकारची लेखी तक्रार दिली होती.

यानंतर भोसले मॅडम यांनी 11/40 वा. दरम्यान त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या एका कर्मचा-याला बोलावुन मा. विभागीय वन अधिकारी कार्यालय, चंद्रपूर वन विभाग, चंद्रपूर यांचे नावे पत्र देवून दोन पंच आणणेकरीता रवाना केले. त्यांनतर अदांजे 12/20 वा. दरम्यान सदर कर्मचारी दोन पंचासह कार्यालयात परत आले. त्या पंचाना भोसले मॅडम यांनी त्यांची नावे विचारून माझी त्यांचेशी व ऑफीसच्या स्टाफशी ओळख करुन दिली. त्यांनतर भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर मी सही करून दिलेल्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे

काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाइच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला सापळा कारवाईकरीता रक्कम जमा करण्याकरीता सांगितले असता मी माझे बचतीतील 1 लाख रू. (रू. 500/- दराच्या 200 चलनी नोटा) सापळा कारवाईसाठी दिल्या. सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदर नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व एका को-या पांढ-या कागदावर अँथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या सर्व नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावून सदर नोटा एका लिफाप्यात टाकुन सदर लिफाफा भोसले मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरून मी दिलेल्या तक्रारीसंबंधाने माझे फोनवर आलेल्या व फोनवरून झालेल्या कॉल रेकार्डची तसेच व्हॉट्सअप मॅसेज व कॉलची स्क्रिन शॉट ची एसीबी ऑफीसच्या एका कर्मचा-याच्या हस्ते संगणकावरून प्रिन्ट काढण्यात आली. सदर स्क्रिनशॉट प्रिन्टवर मी, दोन्ही पंच व भोसले मॅडम यांनी स्वाक्षरी केलेली आहे. त्यानंतर भोसले मॅडम यांनी तलाठी सचिन व तहसीलदार गायकवाड हे कुठे असणार याबाबत मला विचारले तेव्हा मी त्यांना ते दोघेही तहसील कार्यालय बल्लारपूर येथे असतात असे सांगितले असता भोसले मॅडम यांनी पुढील कार्यवाही बल्लारपूर येथे जावुन करणार असे सांगितले.(याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 भोसले मॅडम यांनी तयार केला.)
त्यानंतर पुढील कार्यवाही करीता भोसले मॅडमनी दिलेल्या सुचनेवरून मी माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.34 बि. एक्स. 7786 ने बल्लारपूर कडे अंदाजे दुपारी 02/30 वा. दरम्यान ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथुन निघून बल्लारपूर येथील पेपरमील डम्पयार्ड कडे जाणा-या रोडवर निर्जन ठिकाणी अंदाजे दुपारी 02/50 वा. जावून थांबलो. माझे मागे-मागे भोसले मॅडम, दोन्ही पंच व एसीबी. स्टाफ सुध्दा त्यांचे शासकीय चारचाकी वाहनाने तेथे आले. त्यानंतर पंचासमक्ष कवडजई चे तलाठी सचिन व बल्लारपूरचे तहसीलदार गायकवाड साहेब यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
पडताळणी कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन असल्याचे सांगुन मेमरी कार्ड व व्हाईस रेकर्डरमध्ये कोणतीही फाइल नसल्याची खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.34 बि.एक्स. 7786 नी पंच क्र. 01 यांचेसह आम्ही थांबून असलेल्या ठिकाणावरून तहसील कार्यालय बल्लारपूर येथे पडताळणी करीता दुपारी 03/35 वा. दरम्यान पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत तहसील कार्यालय बल्लारपूर येथे गेलो. तेथे माझे दुचाकी वाहन पार्क करून पंचासह मी तहसील कार्यालयचे ईमरतीमध्ये गेलो. तेथे मी एका व्यक्तीला पटवारी सचिन बाबत विचारले असता त्यांनी जवळच असलेल्या एका रूममध्ये असलेले पटवारी सचिन यांना बोलावले. तेव्हा मी त्यांचेसह बोलत बोलत तहसील कार्यालयाचे बाहेर आलो. तसेच पंचसुध्दा आमचे सोबतच काही अंतरावर आमचे मागेच आले. पटवारी सचिन यांनी मला तहसील कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वाराकडे नेले. तेथे मुख्या प्रवेशद्वाराचे आतील डाव्या बाजुला असलेल्या नाश्त्याच्या दुकानाच्या बाजुला जावून थांबलो. पंचही तेथे आमचे बाजुलाच येवून थांबले. त्यानंतर तेथे बोलत असताना मी त्यांना 'एक नही हो रहे, अस्सी हजार रूपये हो रहे' असे सांगितले असता त्यांनी मला 'देख लो क्या होता है' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'पहले एक बिस दिया, अभी अस्सी दिए..... तो दो लाख हो जाते' असे म्हणालो असता त्यांनी मला 'हंगामा हो गया यार, दो लाख बिस दिया करके, सबको पता चल गया' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना 'अभी अस्सी दु मै' असे विचारले असता त्यांनी मला 'दे देना यार किस लिये मजाकमारी कर रहा, एक बार तो दिया' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना गायकवाड साहब से बात करेंगे क्या असे विचारले असता त्यांनी 'वो बात नही करेंगे, क्या है वो जाके दे दुंगा मै, जाना नही, वो चिल्लाएगा दुबारा देखके सामने' असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना 'फोन पे मारू क्या' असे विचारले असता त्यांनी मला 'फोन पे मत मारो' असे म्हणून कॅश देण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना 'गायकवाड साहाबसे बात करता था, अस्सी हजार रूपये दे देता था' असे विचारले असता त्यांनी मला 'किसलिए... पहले से हुआ हैन एक बार' असे म्हणाले . त्यावर मी त्यांना 'साहब बोलना एक बिस दिया अभी, अस्सी दे रहा तो हो जाते खतम करतो जानदो बोलना अभी से.. बात करते

क्या एक बार' असे म्हणालो असता त्यांनी मला बाहेर चलण्यास सांगितले.

त्यानंतर तलाठी सचिन यांनी मला तेथे जवळच असलेल्या चारचाकी टाटा कंपणीच्या गाडीमध्ये बसुन बाहेर चलण्यास सांगितले. त्यामुळे मी पंचांना घेउ का असे विचारले असता तलाठी सचिन यांनी पंचांना गाडीमध्ये घेण्यास नकार दिला. भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मला त्यांचेसोबत गाडीत बसुन जायचे नव्हते परंतु तलाठी माझे तहसीलदार गायकवाड साहेबांसोबत बोलणी करून देत नसल्याने मी त्यांचेसोबत त्यांचे गाडीत बसुन जायला तयारी दर्शविली. त्यानंतर तलाठी यांनी त्यांची गाडी तहसील कार्यालयचे मुख्य प्रवेशद्वारातुन बाहेर काढली व तेथुन अंदाजी 500 मी. दुर बल्लारपूर येथील गोल पुलीया जवळ गाडी थांबविली. तेथे गाडीतच बसुन असतांना मी त्यांना 'दो लाख बोहोत नही होते क्या, हो गया लो ना अभी, एक लाख बिस लिया, अस्सी ले लिया खतम विषय' असे म्हणालो असता त्यांनी मला 'बिस तु मेरे लिए दे देना' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'साहब को बोलो अस्सी हजार दे रहा बोलना' असे बोलुन त्यांना मोबाईलचा स्पिकर ऑन करून बोलायला सांगितले. त्यानंतर तलाठी सचिन यांनी त्यांचे मोबईलवरून गायकवाड साहेब यांना व्हॉट्स अप वर कॉल करून स्पिकर ऑन करून बोलु लागले. तलाठी सचिन यांनी गायकवाड साहेब यांना माझ्याबद्दल सांगुन 'तो एंशी देता म्हणतोय, एक लाख नाही म्हणतोय' असे सांगितले. त्यावर गायकवाड साहेब यांनी 'बघा काय करता येईल' असे म्हणाले. त्यावर तलाठी सचिन यांनी 'बोलतो म्हणतोय देऊ का फोन' त्यावर गायकवाड साहेब यांनी 'काय करायच, जाऊ दे' असे म्हणाले. त्यानंतर तलाठी यांनी त्यांचे फोन चा आवाज कमी करून गायकवाड साहेबांशी बोलणी करून फोन कट केला. त्यानंतर मी त्यांना 'ठिक है एंशी' असे विचारले असता त्यांनी मला नव्वद हजार सांगुन 'ले लो बोलते' असे सांगितले. त्यावर मी त्यांना 'मारू फोन पे' असे विचारले असता त्यांनी मला 'फोन पे मत मारो.. डायरेक्ट कॅश दे दो' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'अस्सी हजार ना' असे म्हणालो असता त्यांनी मला 'नब्बे बोल रहे, अभी इतना भी ये मत करो' असे म्हणाले असता मी त्यांना 'ठिक है' असे म्हणालो असता त्यांनी मला 'एस बी आय बँक के होते पैसे' असे म्हणाले असता मी त्यांना 'मेरा बँक ऑफ इंडिया का अकाऊंट है, अकाऊंट से कायकु मै फोन पे मारता' असे म्हणालो असता त्यांनी मला 'नही वो बंदे के पास दे देना था पैसे' असे म्हणुन मी त्यांना पैसे घेवून साडे-चार पाच वाजेपर्यत येतो असे म्हणुन तहसील ऑफीसला भेटता की बाहेर असे विचारले असता त्यांनी मला 'बाहर मिलते' असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला 'ये होणे के बाद साहब से मिलाता आपको मै, थोडी बात कर लेना, बोलना मेर पास नही था साहब गलती हो गया' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'तहसीलदार से पंगा लेके कोण करेंगा, उसदिन मै एक बिस दिया, अगर मै बोलता साहाब को दो बिस की बात हुइ, एक बिस है एक बिस उधार रखो तो रखते नही थे, गाडीच लगाओ बोलते थे, तुम्हारेको बिस हजार मिले तो उसको एक लाख रू. मिले, अभी नब्बे हजार लेंगे, दो दस हो जाते, हो गया ना और कित्ता होरा मर जारा आदमी इधर' असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला 'हो तो अच्छा ठिक है ना नौ लाख साठ का सांशन चेक है तो ठिक है' असे म्हणाले असता मी त्यांना 'नौ लाख वहा बहोत तुम लोगोने पैसे लिए कुढ भी करे छोडे इत्तेसे अच्छा हो गया' असे म्हणालो. त्यानंतर त्यांनी मला 'कहा छोडना' असे विचारले असता मी त्यांनी 'तहसील मे गाडी है, भाईजान है' असे म्हणुन 'आधे-एक घंटे मी फोन लगाता आपको कहा बुलाना है बुलालो' त्यावर त्यांनी मला 'वो लांडे भाऊ के पास' असे म्हणाले व आम्ही तेथुन निघुन तहसील कार्यालय बल्लारपूर येथे आलो व 'आधे-एक घंटे मे फोन लगाता' असे म्हणुन मी त्यांचे गाडीतुन उतरून पंचासह भोसले मॅडम व स्टाफ थांबून असलेल्या ठिकाणी अंदाजे दुपारी 04/10 वा. परत आलो. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे मी, पंच क्र. 01, पंच क्र. 2 व भोसले मॅडम नी वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.

त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणी करून परत आल्यानंतर अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता तलाठी सचिन व तहसीलदार गायकवाड यांनी माझेवर कोणतीही कारवाई न करण्याकरीता व गाड्या जप्त न करण्याकरीता दि. 23/06/2025 रोजी 2 लाख 20 हजार रू. पैकी 1 लाख 20 हजार घेतले असुन उर्वरित 1 लाख रू. ची मागणी करून तलाठी यांनी माझे समोर तहसीलदार गायकवाड यांना फोन लावून 90,000/- रू. स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी सचिन यांनी मला लांडे भाऊ हे पास येण्यास सांगितले परंतु लांडे ला मी ओळखत नाही. त्यावरून तलाठी सचिन व तहसीलदार गायकवाड यांचेविरूध्द सापळा कारवाइ करण्याचा भोसले मॅडम व पंचांनी निर्णय घेतला. मी तलाठी यांना अर्ध्या-एक तासात फोन करतो असे सांगितल्याने तसेच तलाठी सचिन यांनी एस.बी.आय. बँकेचा उल्लेख केल्याने मला बल्लारपूर येथील एस.बी.आय. बँकेजवळ जावून

तलाठी सचिन यांना फोन लावून फोन स्पिकरवर ठेवून पंचासमक्ष तेथे आल्याबाबत तलाठी सचिन यांना सांगण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळापूर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
त्यानंतर तलाठी सचिन यांनी मला 1 लाख रू. ची मागणी करून 90 हजार रू. स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने भोसले मॅडम यांनी मी जमा केलेल्या लाच रकमेच्या लिफाफ्यातून 90 हजार रू. वेगळे काढून माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आली. तलाठी सचिन यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागावर येवून माझे डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढून डाव्या हातातच ठेवण्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगितले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य ईशारा मिळतातच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.
त्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पडताळणी कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले मेमरी कार्ड व त्यामध्ये पडताळणी कारवाइची तयार झालेली फाईल असल्याचे सांगितले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.34 बि.एक्स. 7786 नी पंच क्र. 01 यांचेसह आम्ही थांबून असलेल्या ठिकाणावरून बल्लारपूर येथील एस.बी.आय. बँकेजवळ सापळा कारवाईकरीता सायंकाळी 05/15 वा. दरम्यान रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकीय वाहनाने रवाना झाले. मी पंचासह बल्लारपूर येथील एस.बी.आय. बँकेजवळ माझे दुचाकी वाहन थांबविले असता भोसले मॅडम यांनी त्यांचे वाहन लाबंच थांबवून वाहनातुन उतरून सापळा पथकातील भोसले मॅडम व सदस्यही आमचे आजुबाजुला मला दिसणार अशा रितीने तेथे थांबले. त्यानंतर मी एस.बी.आय. बँकेजवळ आलो असल्याचे सांगण्याकरीता मी तलाठी सचिन यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद येत होता. त्यानंतर काही वेळातच तलाठी सचिन मी व पंच थांबुन असलेल्या ठिकाणी आले. मी त्यांना 'कहा गए, फोन क्यु बंद है' असे विचारले असता त्यांनी मला 'कल' असे म्हणले. त्यावर मी त्यांना 'कल, जाऊ क्या फिर, पैसे देवु क्या कैसे' असे विचारले असता त्यांनी मला 'अभी नही कल देना, अभी यहा पे मत दो, कॉल करूंगा मै' असे म्हणुन तलाठी सचिन तेथुन निघुन गेला. त्यामुळे मी सुध्दा पंचासह माझे दुचाकी वाहनाने एस.बी.आय. बँकेजवळून निघालो. आम्हाला निघताना बघुन भोसले मॅडम व सापळा पथकसुध्दा त्यांचे शासकीय वाहनाने आमचे मागे-मागे निघाले. मी पंचासह दुचाकी वाहनाने कारवाईदरम्यान थांबुन असलेल्या ठिकाणी अंदाजे 05/35 वा. परत आलो. आम्हाला पाहुन भोसले मॅडम व सापळा पथक आमचे मागे-मागे तेथे परत आले. त्यांनतर लाचरक्कम मागणीबाबतची सापळा कार्यवाही न झाल्याने परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे पंच क्र. 01 यांनी वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. एका कर्मचा-यांनी माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून लिफाप्यात ठेवली. सदर लिफाफा मॅडमने स्वत: ताब्यात घेतला.
त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळा कार्यवाही न झाल्याने परत आल्यानंतर अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन सापळा कार्यवाहीकरीता पाठविल्याबाबतच्या संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता तलाठी सचिन यांनी मला लाच रक्कम उद्या देण्यास सांगितले असुन त्याकरीता फोन करतो असे सांगितले. त्यामुळे भोसले मॅडम यांनी मला माझे दुचाकी वाहनाने एसीबी ऑफीस ला येण्यास सांगितले व भोसले मॅडम व सापळा पथक त्यांचे शासकीय वाहनाने सायंकाळी अंदाज 06/15 वा. रवाना झाले. मी सुध्दा तेथुन निघुन सायंकाळी अंदाजे 06/50 वा. एसीबी ऑफीसला पोहचलो.
त्यानंतर तलाठी सचिन यांनी तहसीलदार गायकवाड साहेबांकरीता मला 90,000/- रू. ची मागणी केल्याने भोसले मॅडम यांनी त्यांचेकडे मी जमा केलेल्या 1 लाख रू. पैकी 10,000/- रू. मला पंचासमक्ष परत केले. तसेच तलाठी सचिन यांनी 'अभी नही कल देना, अभी यहा पे मत दो, कॉल करूंगा मै' असे म्हणुन माझेकडून लाच रक्कम न स्विकारता निघुन गेले. त्यामुळे भोसले मॅडम यांनी दि. 26/03/2025 रोजीची कार्यवाही स्थगित ठेउन पुढील कार्यवाही तलाठी सचिन यांचा मला फोन आल्यानंतर करण्याचे ठरविले. त्यानंतर मला, पंच व सापळा पथकाला गोपनीयता बाळगण्याचे सुचना दिल्या तसेच मला जर तलाठी सचिन यांचा लाच रक्कम घेवून येण्याबाबत फोन आल्यास एक ते दिड तास लागेल असे सांगुन आम्हास त्वरीत कळविण्याबाबत सांगितले. (याबाबत केलेल्या

कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 2 भोसले मॅडम यांनी तयार केला.)
दि. 30/03/2025 रोजी मी माझे मौजा कोठारी येथील शेतात असतांना सकाळी अंदाजे 09/00 वा. दरम्यान तलाठी सचिन व तहसीलदार गायकवाड स्कार्पीयो चारचाकी वाहनाने तेथे आले व माझेशी काहीही न बोलता माझे शेतात सुरू असलेल्या कामाचे फोटो काढून परत गेले. याबाबत मी भोसले मॅडम यांना अंदाजे 09/30 वा. दरम्यान फोन करून सांगितले. त्यावरून भोसले मॅडम यांनी मला तलाठी सचिन यांचा फोन येण्याची वाट बघण्याबाबत सुचना दिल्या. परंतु तलाठी सचिन यांचेकडून मला कोणताही फोन न आल्याने भोसले मॅडम यांनी पुढील कार्यवाही दि. 01/04/2025 रोजी करण्याचे ठरवून दि. 01/04/2025 रोजी बल्लारपूर येथे सकाळी 11/00 वा. येण्यास दि. 31/03/2025 रोजी सायंकाळी 04/30 वा. दरम्यान सांगितले. त्यावरून मी माझे दुचाकी वाहनाने बल्लारपूर येथील पेपरमील डम्पयार्ड कडे जाणाऱ्या रोडवर निर्जन ठिकाणी सकाळी 11/40 वा. दरम्यान आलो. तेथे माझे अगोदच भोसले मॅडम, दोन्ही पंच व सापळा सदस्य शासकीय वाहनाने येवून होते.
त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला तलाठी सचिन यांचा फोन आला किंवा कसे याबाबत विचारणा केली असता मी तलाठी सचिन यांचा मला कोणताही फोन आला नसल्याचे दोन्ही पंचासमक्ष भोसले मॅडम यांना सांगितले. त्यानंतर माझे मोबाईल फोनवरून तलाठी सचिन यांना फोन करून फोन स्पिकर वर ठेवून फोनद्वारे होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्याचे भोसले मॅडम व पंचांनी ठरविले. त्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन असल्याचे सांगुन मेमरी कार्ड व व्हाईस रेकार्डरमध्ये कोणतीही फाईल नसल्याची खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरवर तलाठी सचिन यांना फोन करून पुढील कारवाई करीत असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन मी माझे मोबाईल वरून तलाठी सचिन यांचे मोबाईल क्र. 9730470210 वर फोन केला असता तलाठी सचिन यांना फोन बंद असल्याचे दिसुन आले. त्यामुळे मी माझे मोबाईलवरून तहसीलदार गायकवाड यांचे मोबाईल क्र. 9423323817 वर फोन केला असता तहसीलदार गायकवाड साहेब यांनी माझा फोन उचलला नाही. त्यामुळे मी तलाठी सचिन यांना त्यांचे व्हॉट्सअप वर कॉल केला असता त्यांनी माझा व्हॉट्सअप कॉल उचलला नाही. त्यामुळे फोन न उचलल्याने व्हॉईस रेकॉर्डर बंद करीत असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर बंद केले.
तलाठी सचिन यांचा फोन बंद असल्याने व तहसीलदार गायकवाड साहेब माझा फोन स्विकारत नसल्याने प्रत्यक्ष तहसील कार्यालय, बल्लारपूर येथे मला पंच क्र. 1 सोबत पाठवून तलाठी किंवा तहसीलदार मिळून आल्यास पुढील सापळा कारवाई करण्याचा भोसले मॅडम व दोन्ही पंचांनी निर्णय घेतला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळापूर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.
त्यानंतर तलाठी सचिन यांनी मला 90 हजार रू. मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने भोसले मॅडम यांनी मी जमा केलेल्या लाच रकमेच्या लिफाफ्यातून 90 हजार रू. काढून माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आली. तलाठी सचिन किंवा तहसीलदार गायकवाड यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागावर येवून माझे डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढून डाव्या हातातच ठेवण्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगितले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य ईशारा मिळतातच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.
त्यानंतर भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार रोशन चांदेकर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचेसोबत सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 1 व पंच क्र. 2 नी वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझ्या छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.34 बि.एक्स. 7786 नी पंच क्र. 01 यांचेसह आम्ही थांबून असलेल्या ठिकाणावरून बल्लारपूर येथील तहसील कार्यालय बल्लारपूर येथे सापळा कारवाईकरीता दुपारी 12/30 वा. दरम्यान रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकीय वाहनाने रवाना झाले. मी पंचासह बल्लारपूर येथील तहसील कार्यालयाचे मुख्य प्रवेशद्वारातुन आत जावून तमाझे दुचाकी वाहन थांबविले असता भोसले मॅडम यांनी त्यांचे वाहन लाबंच थांबवून वाहनातुन उतरून सापळा पथकातील भोसले मॅडम व सदस्यही आमचे आजुबाजुला मला दिसणार अशा रितीने तहसील कार्यालय बल्लारपूर परिसरात थांबले. त्यानंतर मी पंचासह तहसील कार्यालय बल्लारपूर र्‌इमारतीच्या आत गेलो व दि. 26/03/2025 रोजी तलाठी सचिन ज्या रूममध्ये होते त्यारूममध्ये हजर असलेल्या एका व्यक्तीला तलाठी सचिन यांचेबाबत विचारले असता त्यांनी मला तलाठी सचिन सुट्टीवर असल्याचे सांगितले. त्यानंतर मी तहसीलदार साहेब यांचे चेंबर

विचारून त्यांना पंचासह भेटण्याकरीता गेलो. तेव्हा तहसीलदार यांचे चेंबरच्या बाहेर असलेल्या महीलेला विचारून मी पंचासह गायकवाड साहेब यांचे चेंबरच्या आत जात असतांना तहसीलदार गायकवाड साहेब यांनी पंचांना थांबायला सांगितले. त्यानंतर मी त्यांना 'साहेब त्या दिवशी तुम्ही गाडी पकडली, जेसीबी. पकडली, 1 लाख 20 हजार दिले उर्वरित आता पैसे द्यायचे' असे विचारले असता त्यांनी मला 'नाही पकडली मी गाडी, काही पण खोटे आरोप करत आहे, काय संबंध माझा, कोणी घेतले पैसे' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना 'गाडी पकडली पण, पैसे घेतले, पुन्हा तुम्ही कारवाई करायसाठी पुन्हा परत आले साहेब' असे म्हणालो असता त्यांनी 'माझ्या नावाने कोणी घेतले काय पैसे' असे विचारणा केली असता मी त्यांना 'सचिन पटवाऱ्याला व तुम्हाला, नव्वद हजार द्यायची गोष्ट झाली होती मंगळवारी सव्वीस तारखेला' असे म्हणालो. त्यावर त्यांनी 'कोण सचिन पटवारी, मला त्याबद्दल काहीच माहिती नाही' असे म्हणाले. त्यामुळे मी तहसीलदार यांचे साहेबाचे चेंबरमधुन बाहेर आलो व पंचासह तहसील कार्यालय बल्लारपूर येथून माझे दुचाकी वाहनाने निघालो. आम्हाला निघतांना बघुन भोसले मॅडम व सापळा पथकसुध्दा त्यांचे शासकीय वाहनाने आमचे मागे-मागे निघाले. मी पंचासह दुचाकी वाहनाने कारवाईदरम्यान थांबुन असलेल्या ठिकाणी अंदाजे दुपारी 01/00 वा. परत आलो. आम्हाला पाहुन भोसले मॅडम व सापळा पथक आमचे मागे-मागे तेथे परत आले. त्यांनतर लाचरक्कम मागणीबाबतची सापळा कार्यवाही न झाल्याने परत आल्याबाबत प्रमाणपत्राचे भोसले मॅडम, मी, पंच क्र. 01 व 02 यांनी वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. एका कर्मचा-यांनी माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून लिफाफ्यात ठेवली. सदर लिफाफा मॅडमने स्वत: ताब्यात घेतला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी सापळा कार्यवाही न झाल्याने परत आल्यानंतर अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी आम्हास विचारपुस करुन सापळा कार्यवाहीकरीता पाठविल्याबाबतच्या संभाषणाची रेकॉर्डेड फाईल ऐकली असता तलाठी सचिन हे सुट्टीवर असल्याने मिळुन न आल्यान मी तहसीलदार गायकवाड साहेब यांना भेटलो असता तहसीलदार गायकवाड साहेब यांनी मला 'काय संबंध माझा, मला त्याबद्दल काहीच माहिती नाही' असे म्हणाल्याने मी पंचासह तेथुन परत आलो. त्यामुळे तहसीलदार गायकवाड साहेब व तलाठी सचिन हे माझेकडून लाच रक्कम स्विकारणार नसल्याबाबत मी भोसले मॅडम यांना सांगितले. त्यामुळे भोसले मॅडम यांनी तहसीलदार व तलाठी यांना ताब्यात घेवून पुढील कारवाई करण्याचे ठरविले. तसेच मला माझे दुचाकी वाहनाने पंचासह तहसील कार्यालय बल्लारपूर येथे रवाना केले व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकीय वाहनाने रवाना होवून तहसील कार्यालय बल्लारपूर येथे आले व तहसीलदार गायकवाड साहेब यांना ताब्यात घेतले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 3 भोसले मॅडम यांनी तयार केला.)

तरी लाच मागणी संबंधी मी दिलेल्या तक्रारीवरून दि. 26/03/2025 झालेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तहसीलदार गायकवाड साहेब यांचे सांगण्यावरून तलाठी सचिन यांनी माझे शेतात माती/मुरूम काढण्याकरीता असलेले 2 ट्रक्टर व 1 जे.सी.बी. जप्त न करण्याकरीता तसेच माझेवर कोणतीही कारवाई न करण्याकरीता दि. 26/03/2025 रोजी 1 लाख 19 हजार 900 रू. स्विकारले व उर्वरित 1 लाख रू. ची मागणी केली व तडजोडी अंती 90 हजार रू. मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवीली. त्यामुळे (1) अभय अर्जुन गायकवाड, तहसीलदार, तहसील कार्यालय बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर व (2) सचिन रघुनाथ पुकळे, तलाठी-कवडजई साजा, ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी सदरची फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(मंजुषा भोसले)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचतप प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर.

13\. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SHYAM GOVINDRAO GAWHANE(I (Inspector)) / 15101000402SGGM8301X

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

MRShetty 01-04-2025

15\. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SHYAM GOVINDRAO

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402SGGM830

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**